R.No.MAHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990









लातूर वर्ष ५ वे अंक ८७ शुक्रवार दि.१० ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## महाराष्ट्राने गुन्हेगारांना मोठे करणारे मंत्री का सहन करावेत?:अंजली दमानियांचा सवाल; गृहराज्यमंत्री कदम यांच्या राजीनाम्याची मागणी

मुंबई- सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गुरूवारी गँगस्टर नीलेश घायवळ याच्या भावाला शस्त्र परवाना देऊन अडचणीत सापडलेल्या गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. गुन्हेगारांना मोठे करणारे व डान्सबार असणारे मंत्री महाराष्ट्राने का सहन करावेत? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी गँगस्टर गुंड नीलेश घायवळचा भाऊ सचिन बन्सीलाल घायवळ याला शस्त्र परवाना दिल्याचा आरोप ठाकरे गटाने केला आहे. योगेश कदम यांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला शस्त्र परवाना देणे हे कायदा व सुव्यवस्थेला धक्का देणारे आहे. त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून गुन्हेगाराला बळ दिले. त्यामुळे त्यांनी तत्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, असे ठाकरे गटाने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सार्वजनिक सुरक्षेची ऐशीतैशी करणारे तुम्ही कोण? अंजली दमानिया या प्रकरणी म्हणाल्या की, गृहराज्य मंत्री योगेश कदम. मी एक सामान्य नागरीक म्हणून तुमच्या राजीनाम्याची मागणी करते. गुन्हेगारांना मोठे करणारे आणि डान्सबार असणारे मंत्री महाराष्ट्राने का सहन करावेत? पोलिस आयुक्तांचा अहवाल/शिफारस अत्यंत महत्त्वाची असते. जर परवाना या टप्प्यावर नाकारला गेला असेल तर त्यामागे साधारणपणे गुन्हेगारी पार्श्वभूमी असते. पण आपण पोलिसांच्या नकारानंतर परवाना कसा, आणि का मंजूर केला? एका गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला तुम्ही का दिलात? पोलिसांचा निर्णय तुम्ही का बदलला? याचे उत्तर तुम्हाला द्यावेच लागेल. कारण हा कायद्याचा अपमान आहे. सार्वजनिक सुरक्षेची ऐशीतैशी करणारे तुम्ही कोण? असा खडा सवाल दमानिया यांनी यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.



कुणाला पाठिशी घातले जात आहे? दुसरीकडे, सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही या प्रकरणी योगेश कदम यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. पुणे पोलिसांनी सचिन गायवळ (घायवळ) यांचा बंदूक परवाना नाकारला. हा नीलेश गायवळचा भाऊ, जो बनावट पासपोर्टवर भारतातून पळाला, ड्जउ असतानाही! पण महाराष्ट्र गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी त्याच्या गुन्हेगारी रेकॉर्डकडे दुर्लक्ष करून परवाना मंजूर केला! आर्म्स ॲक्टनुसार सर्व परवाने ND-L--LIS (https://ndal-alis.gov.in) वर सार्वजनिक असले पाहिजेत. परंतु ते का टाळलं जातंय? कुणाला पाठीशी घातलं जातंय, असे विविध सवाल कुंभार यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत. त्यांनी आपले ट्विट महाराष्ट्र पोलिस, पुणे पोलिस आयुक्त व पिंपरी चिंचवड पोलिसांना टॅग करत त्यांना गुंडगिरी थांबवण्याचेही आवाहन केले आहे.

---

## ड.राकेश किशोर यांच्यावर तात्काळ ट्रॉसिटी क्ट सह देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा-चंद्रकांत खरात सर

केज/प्रतिनिधी ड. राकेश किशोर यांच्यावर तात्काळ ट्रॉसिटी क्ट अनुसार व देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीचे लेखी निवेदन केज तहसीलदार यांना भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी.आर.गवई यांच्यावर करण्यात आलेला हल्ला हा निंदनीय असून भारतीय संविधानाची पायमल्ली करणारे दुष्कृत्य करण्यात आलेले आहे त्यामुळे भारतीय संविधानाचा अपमान करून समाज बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. ड. राकेश किशोर या इसमाने सरन्यायाधीश यांच्यावर चप्पल फेकून त्यांचा अवमान केला तो अवमान त्यांचा नसून देशाच्या संविधानाचा आहे. हा देश संविधानावर चालतो हुकूम शाहीवर नाही. आशा वृत्तीच्या सडलेल्या मानसिकतेच्या लोकांवर तात्काळ ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर देशद्रोहाचा पण गुन्हा दाखल करण्यात यावा अशी भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब व देशाचे गृहमंत्री मा. अमित शहा साहेब यांना या लेखी निवेदनाद्वारे केली आहे. शासनाने निवेदनाची तात्काळ दखल घेऊन देशाला न्याय देण्यात यावा जर न्याय न मिळाल्यास तीव्र स्वरूपाचे भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने आंदोलन



करण्यात येईल असा प्रशासनाला इशारा देण्यात आलेला आहे. सदर मागणीचे निवेदन हे नायब तहसीलदार श्रीमती अशा वाघ मॅडम यांनी स्वीकारले. या लेखी निवेदनावर भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, अक्षय वाघमारे, अशोक सरवदे, शेख अल्लाउद्दीन, शिवप्रसाद हजारे, सुनील धीमधीमे, विजयकुमार शिंदे, किशोर पोटभरे, सुभाष सरवदे, प्रकाश गायकवाड, सचिन शिनगारे, सिद्धार्थ बनसोडे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या वकिलावर कडक कार्यवाही करा - अश्रूबा खरात

केज/प्रतिनिधी जातीय द्वेषातून सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत राकेश केशव नावाच्या वकिलाने गैरवर्तन केले त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे. भारत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा.भूषण गवई यांच्यावर जातीय मानसिकतेने राकेश केशव नावाचा वकील धावून गेला आणि तो पायातला बूट काढणार त्याचवेळी न्यायालयातील सुरक्षारक्षक त्याच्या दिशेने धावले व न्यायालयाबाहेर नेले त्यामुळे मोठा अनर्थ टळला सनातन का अपमान नही सहेंगा हिंदुस्तान अशा घोषणा सडलेल्या मनोवादी वकिलांनी यावेळी दिल्या होत्या, त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने या वकिलाचा जाहीर निषेध करून या वकिलावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी दि.०९.१०.२०२५ रोजी केज येथील तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या आदेशाने व मराठवाडा



अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिले आहे. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाच्या मराठवाडा महिला अध्यक्ष आम्रपाली गजेशिव, मराठवाडा प्रवक्ते ज्ञानेश्वर गिरी, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बीड बाळासाहेब जाधव,केज तालुका अध्यक्ष आश्रुबा खरात,आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांच्या नियुक्तीचे अनेकांकडून अभिनंदन

लातूर :- भाजयुमोचे प्रदेश सचिव तथा युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांची लातूर जिल्हा ग्रामीण भारतीय जनता युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती जाहीर करण्यात आली असून नियुक्ती जाहीर होताच अनेकांनी फटाके फोडून, सत्कार करून ऋषिकेशदादा यांचे अभिनंदन केले.





गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात अत्यंत प्रभावी प्रचार यंत्रणा राबवून आपल्या खास वक्तृत्व शैलीत प्रभाव टाकणारे युवा नेते भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांची लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड जाहीर झाल्याचे समजताच भाजपा संवाद कार्यासमोर फटाके फोडून आनंद व्यक्त केला तर अनेकांनी पुष्पहार घालून पेढे भरून अभिनंदन केले.

लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांची भाजपाच्या संवाद कार्यालयात भेट घेऊन ऋषिकेश दादा कराड यांनी आशीर्वाद घेतले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे भागवत सोट, सतीश आंबेकर, अनिल भिसे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, दशरथ सरवदे, पांडुरंग बालवाड, अमर चव्हाण, श्याम वाघमारे, चंद्रकांत कातळे, महादेव साळुंके, रवींद्र नागरगोजे, बाबासाहेब भिसे, संपत कराड, लक्ष्मण यादव,भाऊसाहेब गुळबिले, राज जाधव, नरसिंग येलगटे, चंद्रकांत माने, ओम चपटे, अनिकेत गुड्डे, लक्ष्मण खलंग्रे, विजय चिते, मोहम्मद खान, अभिमान वायबसे, सचिन जाधव, शिवम मिटकरी यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदी अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न



देवणी : ज्या भाषेचा उपयोग बोलीभाषेत होत राहील तीच भाषा समाजामध्ये जास्त दिवस जिवंत राहते .भाषेचा जिवंतपणा हा त्या भाषेच्या व्यवहारात होणाऱ्या उपयोगावर अवलंबून असतो यामुळेच आज संस्कृत भाषा ही व्यवहारात नाही असे कथन राजर्षी शाहू महाविद्यालय हिंदी विभागाचे प्रा. सूर्यकांत चव्हाण यांनी केले .ते रसिका महाविद्यालयात हिंदी दिवस तथा हिंदी अभ्यास मंडळ उद्घाटन प्रसंगी बोलत होते.आज पाश्चात्य राष्ट्रांच्या नजरेत भारत हा देश खूप मोठी बाजार व्यवस्था आहे यासाठी हिंदी भाषा ही शिकावीच लागेल. हिंदी भाषेचं भविष्य उज्वल आहे विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा अभ्यास करावा ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी या संस्थेचे अध्यक्ष मा. गोविंदरावजी भोपणीकर हे होते.या कार्यक्रमाची सुरुवात महाकवी वाल्मिकी व संस्थापक सचिव आबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून झाले.स्वागत गीत सपना भोसले यांनी गायले यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार तसेच अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कोरे प्रेरणा, उपाध्यक्ष म्हणून सय्यद मुस्कान ,सचिव माने दिपाली ,कोषाध्यक्ष शेख साहेब ,सहकोषाध्यक्ष जगताप अंजली सदस्य म्हणून सय्यद मिनाज ,कोणाळी दीपा ,बेलुरे गायत्री यांची निवड करण्यात आली .हिंदी पंधरवाडा निमित्त विभिन्न स्पर्धा घेण्यात आल्या .निबंध प्रतियोगिता या स्पर्धेमध्ये माया पवार हिने प्रथम तर सय्यद मुस्कान द्वितीय ,डिगोळे अंजली तृतीय पारितोषिक प्राप्त केले .भित्तिपत्रक प्रतियोगिता मध्ये माया पवार ,खुशी चौधरी दिव्या बिरादार द्वितीय, लहू मेत्रे यांनी तृतीय क्रमांक पटकावला .यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भितीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा.धनराज बिराजदार यांनी केले. निकिता कांबळे या विद्यार्थिनीने हिंदी दिवसाचे महत्त्व प्रतिपादन केले. महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले .

---

## सरन्यायाधीशांवर बूटफेक प्रकरण:खासदार नीलेश लंकेंचा अनोखा निषेध, थेट वकिलाच्या घरी जाऊन दिली संविधानाची प्रत

मुंबई- सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकून मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी देशभरातून संताप व्यक्त होत आहे. सरन्यायाधीशांवर बुट फेकणाऱ्या वकिलाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी आज एक अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. नीलेश लंके यांनी थेट वकील राकेश किशोर यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी वकिलाला संविधानाच प्रत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो भेट देत त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान वकील राकेश किशोर यांनी भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी राकेश किशोर यांच्याविरुद्ध बंगळुरूमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयीन सभागृहात घडलेली ही घटना अभूतपूर्व मानली जात असून, तिचा निषेध विविध स्तरावरून व्यक्त केला जात आहे. दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यातील विविध ठिकाणी या घटनेविरोधात आंदोलन केले. त्यानंतर आज नीलेश लंके यांनी राकेश किशोर यांची दिल्ली येथे भेट घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलत असताना भेटीमागचा उद्देश सांगितला. काय म्हणाले नीलेश लंके? नीलेश लंके यावेळी म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे संविधान निर्माण केले. संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे. भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याबाबत जो प्रकार घडला, तो एका व्यक्तीचा अवमान नसून संपूर्ण देशाचा अवमान होता. जे कृत्य घडले, त्याचा शांततेच्या मार्गाने निषेध करण्यासाठी मी आंबेडकरांचा फोटो आणि संविधानाची प्रत घेऊन येथे आलो आहे. राकेश किशोर यांच्याकडून घडलेली घटना संकुचित आणि मनुवादी विचारांमधून घडलेली घटना आहे. संविधानाचा त्यांना कुठेतरी त्यांना विसर पडला आहे. त्याची त्यांना पुन्हा जाणीव करून देण्यासाठी मी इथे आलो आहे, असे नीलेश लंके यांनी स्पष्ट केले. नेमके प्रकरण काय? राकेश किशोर यांनी ६ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. बूट सरन्यायाधीशांपर्यंत पोहोचू शकला नाही. त्यावेळी सरन्यायाधीशांच्या खंडपीठात एका खटल्याची सुनावणी सुरू होती. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी वकिलाला ताब्यात घेतले आणि बाहेर काढले. घटनेदरम्यान त्यांनी भारत सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही अशा घोषणा दिल्या. या घटनेचा देशभरातून निषेध व्यक्त करण्यात आला होता.

राकेश किशोरवर बंगळुरूमध्ये गुन्हा दाखल दरम्यान, सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी वकिलाविरुद्ध तक्रार दाखल करण्यास नकार दिला आहे. मात्र, बंगळुरूमधील ऑल इंडिया ॲडव्होकेट्स असोसिएशनने राकेश किशोर यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. बंगळुरू पोलिसांनी भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम १३२ आणि १३३ अंतर्गत एफआयआर नोंदवला आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने वकील राकेश किशोर यांचे सदस्यत्व गुरुवारी तात्काळ प्रभावाने रद्द केले.

## संपादकीय

# अमेरिकेतील ‘शटडाऊन’

अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अविचारी आर्थिक धोरणांचे आणि अविवेकी निर्णयांचे परिणाम त्यांच्याच देशात दिसू लागले आहेत. विरोधकांशी चर्चे तून मार्ग काढण्यात त्यांना अपयश आल्याने ही महासत्ता पुन्हा अस्वस्थ बनली आहे. देशाचा अर्थसंकल्प संमत करण्यात ट्रम्प यांना अपयश आल्याने १ ऑक्टोबरपासून देशात ‘शटडाऊन’ लागू झाले. साहजिकच सरकारच्या आवश्यकतेच्या बाहेरील शासकीय कामकाजास त्याचबरोबर त्यावरील खर्चास स्थगिती लागू झाली.

अमेरिकेच्या राजकारणात अर्थसंकल्पावरून होणारा राजकीय संघर्ष तसा नवा नाही, ही सामान्य बाब असली, तरी ट्रम्प यांचे राजकीय अपयश त्यातून उघड झालेच, शिवाय सार्वजनिक खर्चावरून उडालेला हा संघर्ष तणावपूर्ण पातळीवर पोहोचला आहे. ऑक्टोबर आणि त्यानंतरच्या काळात सरकारी सेवांना निधी पुरवण्याचा प्रस्ताव मांडणारे विधेयक मंजूर करण्याबाबत रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक या दोन्ही पक्षांमध्ये एकमत झालेले नसल्याने हा पेचप्रसंग ओढवला आहे. ट्रम्प यांनी पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून राष्ट्रीय सरकारचा आकार किंवा त्यातील मनुष्यबळात मोठ्या प्रमाणात कपात सुरू केली आहे. ‘शटडाऊन’च्या निमित्ताने कर्मचारी संख्येत आणि त्यायोगे सरकारी खर्चात कपात करण्याचे ट्रम्प यांचे प्रयत्न आहेत. गेल्या मंगळवारी सभागृहात झालेल्या मतदानानंतर बुधवारपासून ‘शटडाऊन’ सुरू झाले.

सलग चौथ्यांदा निधी विधेयक मंजूर करण्यात ट्रम्प अपयशी ठरले. त्यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या निधी विधेयकाला संसदेच्या वरिष्ठ सभागृहात (सिनेट) ५४ मते मिळाली. विधेयक मंजुरीसाठी त्यांना ६० मतांची आवश्यकता होती. कोव्हिड काळात प्रदान केलेली आरोग्यसेवा अनुदाने वाढवावीत, अशी विरोधी डेमोक्रॅटस्ची मागणी आहे. लाखो अमेरिकन लोकांना परवडणारा आरोग्य विमा त्यामुळे मिळू शकेल, असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे हे विधेयक रोखले गेल्याने ही वेळ आली. १०० सदस्यांच्या सिनेटमध्ये ५३ रिपब्लिकन आणि ४७ डेमोक्रॅट आहेत. दोन स्वतंत्र सदस्यांनी आधीच या विधेयकाला पाठिंबा दिला आहे. रिपब्लिकन पक्षाला डेमोक्रॅटस्च्या पाठिंब्याची आवश्यकता आहे; परंतु सध्या ते विधेयकाच्या बाजूने मतदान करण्यास तयार नाहीत. रिपब्लिकन नेते जॉन थुन यांनी आरोप केला आहे की, डेमोक्रॅटस्नी कट्टरपंथी समर्थकांच्या दबावापुढे झुकून सरकारचे कामकाज ठप्प केले. त्यामुळे लष्कर, सीमा एजंट आणि हवाई वाहतूक नियंत्रक पगाराशिवाय काम करत आहेत. डेमोक्रॅटिक नेते चक शुमर यांनी ट्रम्प अमेरिकेच्या आरोग्य सेवा कार्यक्रमाला सुरक्षित करण्यास नकार देत आहेत आणि ते ‘शटडाऊन’साठी जबाबदार आहेत, असा आरोप केला आहे. प्रतिनिधी सभागृहात (कनिष्ठ सभागृह) पुढील आठवड्यात होणारे मतदान १४ ऑक्टोबरपर्यंत रद्द करण्यात आल्याने हे ‘शटडाऊन’ तोपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. अमेरिकेत नेमके काय सुरू आहे, याचा अंदाज येण्यास हा घटनाक्रम पुरेसा आहे. या राजकीय आणि आर्थिक कोंडीचे पडसाद केवळ तिथेच नाही, तर भारतासकट संपूर्ण जागतिक अर्थकारणावर उमटत आहेत. ‘शटडाऊन’मुळे अमेरिकेच्या जीडीपीमध्ये सुमारे ०.१ टक्के घट होत असल्याचे अर्थतज्ज्ञांचे अंदाज आहेत. दीर्घकालीन ‘शटडाऊन’मुळे ही घट अधिक तीव्र होण्याचा धोका आहेच, शिवाय शासकीय कामकाजातील दिरंगाईमुळे त्याचा आर्थिक आघाडीवर गंभीर परिणाम होण्याचाही आहे. त्याने उत्पादकता रोडावण्याची शक्यता आहे.

‘शटडाऊन’मुळे देशातील तब्बल ७.५ लाख शासकीय कर्मचारी बिनपगारी रजेवर (फर्लो) गेले आहेत. त्यांचा आर्थिक भार, सरकारी सेवेतील व्यत्यय, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास या सर्वांचा एकत्रित परिणाम आर्थिक वाढीवर होण्याचा धोका आहे. कर्मचार्यांना ‘शटडाऊन’नंतर वेतन दिले जाणार असले, तरी सद्यस्थितीत उपभोग आणि व्यक्तिगत खर्चावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारी अहवाल, सांख्यिकी माहिती, जीडीपी उत्पादन, रोजगार अहवाल तसेच आर्थिक निर्देशांकाचे प्रकाशनही थांबण्याचे संकेत आहेत. गुंतवणूकदार, व्यापारी यांना त्याचा मोठा फटका बसणार असून फेडरल बँकेचे संचलनसुद्धा अडचणीत येऊ शकते. त्याचा थेट परिणाम शेअर बाजारावर दिसत असून अल्पकालीन अस्थिरता जाणवत असली, तरी अजून निर्णायक मंदीची स्थिती नाही. देशाच्या संरक्षण प्रकल्पांवरही प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार असल्याने ट्रम्प टॅरिफनंतर निर्माण झालेल्या या नव्या घडामोडींची आयटी, फार्मा, वस्त्रोद्योग, स्टार्टअप्स आदी क्षेत्रांना थेट व अप्रत्यक्ष झळ बसू शकते. अमेरिकेशी व्यापार करार खोळंबला असून त्या विलंबामागे हे एक प्रमुख कारण आहे. ट्रम्प यांनी लागू केलेल्या व्हिसा धोरणाच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण होण्यामागेही हेच कारण सांगितले जाते. याचाच अर्थ आयटी, वस्त्रोद्योग, औषध निर्माण क्षेत्राला त्याची मोठी झळ बसू शकते. नवे आयटी प्रकल्प रेंगाळण्याचा धोकाही आहे. डॉलरमधील मागणी वाढल्याने रुपया कमजोर होऊ लागला आहेच, शिवाय परकीय गुंतवणूकदारांचा ओघ आणखी कमी झाल्यास त्याचबरोबर गुंतवणूक काढून घेण्याचे प्रमाण वाढल्यास त्याचा गंभीर परिणाम संभवतो. ‘शटडाऊन’चा कालावधी वाढला, तर रुपयाचा प्रतिडॉलर दर ८८-८९ पर्यंत जाऊ शकतो, तर १० वर्षांचे बाँड यिल्ड ७.५ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. परिणाम म्हणून भारतातील निर्यातीत सुमारे १.५ अब्ज डॉलरची घसरण होण्याचा धोका वर्तवला जात आहे. त्यामुळे साहजिकच बाजारातील अस्थिरता वाढणार आहे. अर्थात, भारतासोबत चीन, दक्षिण कोरिया, युरोपच्या अर्थव्यवस्थांनाही त्याचे धक्के बसू शकतात.

# भारतीय लोकशाहीला लागलेली जातीय द्वेषाची वाळवी

आज आपला भारत देश जागतिक महासत्तेच्या स्पर्धेत अगदी जवळ जाऊन पोहोचला असला व वैज्ञानिक प्रगती करून चंद्रावर यान व माणूस जरी पाठवण्यात यशस्वी झालेला असला तरी ह्या देशातील जातीय सामाजिक विषमता कायमची नष्ट करण्यात अपयशी ठरला म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही .

हजारो वर्षापासून च्या विषमतावादी मनोरुचित समाज रचनेला हादरा देऊन देशात स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक लोकशाहीतील आदर्श अशा भारतीय संविधानाने येथे धर्मनिरपेक्ष सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सत्ताधाऱ्यांना राज्यघटनेतील विविध कलमांच्या आधारे समता प्रस्थापित करण्याचे निर्देश दिलेले आहेत पण इच्छाशक्तीच्या अभावानेच येथील विषमतेची वाळवी आजही तग धरून आहे वेळप्रसंगी ती अधून मधून लोकशाहीला पोखरते .

सनातन का अपमान नही सहेगा हिंदुस्थानअसे ओरडत सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट फेकण्याचा राकेश किशोर नावाच्या वकिलाचा प्रयत्न ही मोठ्या अराजकतेची नांदी आहे .हे वकील बनवणाऱ्या सनातनी करमट विषमतावादी विचाराच्या नराधमाची कृती हे सरन्यायाधीश पदाचा न्यायदेवतेचा संविधानाचा घोर अपमान करणारे आहे .कारण सर्वोच्च न्यायालय हेच भारतीय राज्यघटनेचे खऱ्या अर्थाने संरक्षक आहे आणि सरन्यायाधीश पदाचा बहुमान अनन्य आहे .तेव्हा त्याचा जाहीर निषेधच केला पाहिजे .

न्यायमूर्ती भूषण गवई हे पहिले बौद्ध सरन्यायाधीश आहेत , हिंदू नाहीतअसा सुनियोजित प्रचार केला गेला .जातभावनात चेतवण्यात आली सरन्यायाधीश बनल्यापासून न्यायमूर्ती गवई यांनी सतत भारतीय राज्यघटनेचा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा घटनात्मक मूल्यांचा धर्मनिरपेक्षतेचा मानवतेचा पुरस्कार केला आहे .त्यातूनच त्यांनी राकेश किशोर वरची फौजदारी टाळली जरी असली तरी सरकारने हस्तक्षेप करून अशा विकृत संविधान विरोधी अर्थातच देशद्रोह्याला कठोरातील कठोर शिक्षा देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे .तरच पुढील वाढणारी विषमतेची जातीयवादी विषवल्ली नष्ट होईल . आजकाल आपण पाहतो खरंच आपले सामाजिक ऐक्य सुस्थितीत आहे काय ?आज प्रत्येक जात एकमेकांच्या जातीकडे द्वेष भावनेने पाहत आहे .प्रसंगी जातीय संघर्ष ही होत आहेतमग त्याची कारणे काहीही असोत .मुळात राजकीय फायद्यासाठी जर आपण भारतीय आहोत ही ओळख पुसून जन्माने मिळालेल्या जातीचा अभिमान बाळगून जातीची ओळख एवढेच नाही तर जगात कुठेही नसेल इतका शोध की जातींना सुद्धा या निसर्गाचे रंग वाटून दिलेले आहेत व त्यानुसार त्यांची झेंडे सुद्धा ठरलेले आहेत व त्या रंगाचा सुद्धा द्वेष म्हणून काय इतकेच नाही तर विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी करण्याचा शाळा व्यवस्थापन समिती यांना दिलेला अधिकार व त्यातूनच जो समुदाय त्या गावात बहुसंख्य तू त्यांच्या जातींना मिळालेला रंग खरेदी करायचा काय .कुठे चालली आजची विचारसरणी ?हेच आमच्या देशातील महापुरुषांना संतांना स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या क्रांतिकारकांना अभिप्रेत होते काय ?जरी आमचा देश वैज्ञानिक प्रगतीचा टेंबा मिळवत असताना चंद्रावर मंगळावर मानवी वस्ती करण्याचा विचार करताना तिथे सुद्धा जातीय वस्ती निर्माण करेल की काय अशी शंका आली तर वावगे ठरणार नाही . ही जातीय द्वेषाची, विषमतेची वाळवी जर नष्ट करायची असेल तरप्रत्येक भारतीय संविधानिक मूल्य राष्ट्रीय प्रतीके याबद्दल आदर रुजवायलाच पाहिजे त्याचबरोबर सरकारने राजकीय लाभाच्या पलीकडे जाऊन अशा सामाजिक धार्मिक द्वेष पसरवणाऱ्या व्यक्तींना कठोरातील कठोर शिक्षा केल्या तरच जातीय धार्मिक सामाजिक सलोका टिकेल व भारतीय लोकशाही बळकट होईल . जय भीम जय संविधान .

******

लेखक गौतमकुमार नागनाथराव कांबळे
मो नं ९८२२१७२८१८

# मुंबईची नव प्रभात: भारत-ब्रिटन संबंधांसाठी ‘ब्रिस्क’ (BRISK) युगाची सुरुवात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे (UK) प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट’च्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

ऐतिहासिक वळण: ‘कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’ (Comprehensive Strategic Partnership)

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक ‘कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चे रूप मिळाले आहे. ‘भारत-यूके व्हिजन २०३५’ या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन

मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला ‘व्यापक आर्थिक आणि व्यापार करार’ (CET- - Comprehensive Economic and Trade -greement) आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील. या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (Tariffs) संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला (Innovation) प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे. हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत. हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना (SME's) सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या (Red Tape) अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या ‘व्यवसाय सुलभतेचे’ (Ease of Doing Business) भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते. प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे ‘व्यवसाय सुलभतेचे’ हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो. या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.

हिंद-प्रशांतमध्ये (Indo-Pacific) सुरक्षा बंधन मजबूत करणे ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे - जे ‘व्हिजन २०३५’च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत (Indo-Pacific) धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे. अलीकडील नौदल सराव ‘कोंकण २०२५’मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता (Interoperability) आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते. भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने (-erial Defence Exercise) या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता (Tri-service coordination) या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.

याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा ‘संरक्षण औद्योगिक रोडमॅप’ (Defence Industrial Roadmap) खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास (Co-development) आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम (Innovation) आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

‘लिव्हिंग ब्रिज’: चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी

धोरणात्मक करारांपलीकडे, ‘लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी ‘लिव्हिंग ब्रिज’ या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा (Diaspora - स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात. २०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता (Talent Mobility) आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

‘व्हिजन २०३५’च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे. याला पूरक म्हणून, भारत-यूके ‘ग्रीन स्किल्स’ भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये (Environmental Resilience) तरुणांची क्षमता विकसित करते - ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते. तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो. डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात (Financial Inclusion) भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे (Global Financial Ecosystem) पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो. ‘तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा’ (Technology Security Initiative) द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (-I) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

हवामान कृती (Climate -ction) हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (BP) आणि शेल (Shell) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता (Sustainability) हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

नव्या युगाची सुरुवात

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही-तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे (Global Order) आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

***********

ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),
प्रधान सचिव तथा महासंचालक (माहिती व जनसंपर्क).

# चौदाआक्टोबर बोधगया बौद्धमहाविहार मुक्ती मोर्चा ऐक्याची क्रांती ठरो

हा प्रयोग यशस्वी झाल्यास मोठी क्रांती ना रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली होऊ शकते आज जरी विविध गटातटात विखुरलेला पक्ष व आबेडकरी चळवळ असली तरी सर्वाना कळून चुकले आहे आपण कोणतीही भरीव सामाजिक चळवळ पुढे नेऊ शकत नाही एकत्र येणेच काळाची गरज आहे पक्ष फुटल्या नंतर ज्या घडामोडी झाल्या ज्यांनी आपल्या राहुट्या उभारल्या त्याचा फायदा काही अशी त्यांना झाला असेल पण समाजाचे नुसकान झाले या दुहीचा फायदा विविध राजकीय पक्षाने उठविली आज ते नेते कालबाह्य झालेले आहेत फक्त ईतिहास राहिला आलीकडच्या तरुण सुशिक्षित मंडळीना त्याची जाणीव झाली आहे ते आज जरी परिस्थितीनुसार विविध पक्षाकडे झुकले असतील तरी ऐक्यची जाणिव त्यांना होत आहे तसे पाहिले महाराष्ट्रात ना रामदास आठवले ऐड बाळासाहेब आबेडकर सोडता दुसरे भरीव नेते कोणी नाहीत त्यांचेही वय झालेले आहेत याची तरुणपिढीला जाणीव आहे शिवाय ईतर समाज पक्षाप्रमाणे तरुण नेतृत्व तयार होत नाही ही शोकांतिका आहे म्हणून भविष्यात भावीपिढीसाठी आबेडकरी चळवळ तेवत ठेवण्यासाठी तिला धार निर्माण होण्यासाठी एकत्रीकरण महत्वाचे वाटते महाबोधी महाविहार मुक्त करण्यासाठी मोर्चाच्या निमित्ताने सर्वाना बरोबर घेण्याचा प्रयन्त ना रामदास आठवले यांनी सुरु केला आहे उशिराका होईना स्वातार्थ आहे ही पहिलीच वेळ आहे ईतर पक्षात असलेल्या बौध्द कार्यकर्ते यांना निमंत्रण देऊन बोलविले नाही तर रिडल्स सारखे जे मोर्चे निघाले त्यात न आमंत्रण देता ईतरही पक्षातील लोक रस्त्यावर उतरलेच होते परंतु ना रामदास आठवले यांनी खास लक्ष घातल्यामुळे काही संघटना कार्यकर्ते एकत्र आले हे नाकारता येत नाही असिच भूमिका सातत्याने राहिल्यास सद्याची देशातील बौद्धाची परिस्थिती पहाता लोकांनाही एकत्रित होणे गरजेचे वाटते चळवळीतील अनुभवी कार्यकर्ते मग ते कोणत्याही तटागटातील पक्षातील असोत नक्कीच प्रतिसाद देतील आणि यातूनच नवे नेतृत्व पुढे येईल असे वाटल्यास वावगं ठरणार नाही समाजाती विविध क्षेत्रातील मंडळी आहे त्यानी आपल्या कलागुणानी नाविण्य मिळविले आहे त्यांनाही निमंत्रित केले पाहिजे विविध ना रामदासजी आठवले यांनचा प्रयोग निच्शित यशस्वी होईल मानपान सोडून ऐड बाळासाहेब आबेडकर यांच्याशी चर्चा करुन त्यांनचे मन वळविले पाहिजे हे दोन नेते एकत्र आल्यास कोणालाही बोलविण्याची गरज भासणार नाही जे गटात विखुरलेले आहेत त्यांने गट आपोआपच गळून पडतील जे विविध पक्षात स्थलांतरीत झालेत ते आपोआप परत येतील महाराष्ट्रत तरी हा प्रयोग यशस्वी होऊ शकतो उद्याचा मोर्चा भविष्यात ऐक्यचा हिसा होवो हीच अपेक्षा

**********

जयभिम जय सविधान
समाजभूषण कर्मचारी दा गा पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन
उतमराव गायकवाड
९८२१९०७२९६

# राज्यातील वीज कर्मचारी ७२ तासांच्या संपावर - लातूरमध्येही संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर / प्रतिनिधी :- राज्यातील वीज कर्मचारी, अभियंते आणि अधिकारी यांनी सार्वजनिक वीज उद्योगाचे खाजगीकरण रोखण्यासाठी तसेच वीज ग्राहकांच्या हितासाठी ९ ऑक्टोबरपासून सुरू केलेल्या ७२ तासांच्या संपाला लातूरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती कंपनीतील सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी व कंत्राटी कामगारांनी कामबंद आंदोलनात सहभाग घेतला.

=९ खाजगीकरणाविरोधात एकमुखी भूमिका

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या संपादरम्यान लातूरमधील वीज कर्मचारी मोठ्या संख्येने एकत्र जमले. त्यांनी सार्वजनिक वीज उद्योग वाचवा, खाजगीकरण बंद करा, ग्राहकांना स्वस्त वीज द्या अशा घोषणांनी परिसर दुमदुमवला.







=९ मागण्यांचा मुद्देसूद आढावा

कृती समितीने जाहीर केलेल्या मागण्यांनुसार - महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रात अदानी, टोरेंटो आदी खाजगी कंपन्यांना वीज वितरण परवाने देण्यास विरोध. ३२९ विद्युत उपकेंद्रे ठेकेदारांकडे देणे, महापारेषणचे २०० कोटींचे प्रकल्प खाजगी कंपन्यांना देणे, महानिर्मितीतील ४ जलविद्युत केंद्रांचे खाजगीकरण, आणि पारेषण कंपनीचे शेअर बाजारात लिस्टिंग करण्याचा निर्णय मागे घ्यावा. वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी, कामाचे आठ तास निश्चित करावेत, रिक्त पदे मागासवर्गीय आरक्षणासह भरावीत व कंत्राटी कामगारांना कायम करावे. वाढत्या वीज ग्राहकसंख्येनुसार नवीन शाखा, उपविभाग व विभागीय कार्यालयांची निर्मिती करावी.

=९ राज्यव्यापी संपाचा उद्देश

कृती समितीने स्पष्ट केले की हा संप कोणत्याही आर्थिक लाभासाठी नसून जनतेला स्वस्त, विश्वसनीय वीज पुरवण्यासाठी, सार्वजनिक उद्योग वाचवण्यासाठी आणि ग्राहक सेवेत सुधारणा करण्यासाठी आहे. २०२१ मध्ये राज्यातील वीज ग्राहकसंख्या २.८९ कोटी होती, जी २०२५ मध्ये ३.१७ कोटींवर पोहोचली आहे; मात्र त्यानुसार कर्मचारीसंख्या व पायाभूत सुविधा वाढविण्यात आलेल्या नाहीत.

=९ चर्चेतून तोडगा निघालेला नाही

दि. ६ ऑक्टोबर रोजी ऊर्जाविभागाचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक यांच्याशी झालेल्या चर्चेत काही निर्णय ठरले असले तरी त्याचे लेखी कार्यवृत्त बदलण्यात आल्याने कामगार संघटनांना संपाचा मार्ग स्वीकारावा लागला, असे कृती समितीने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या वतीने लातूर येथील मुख्य अभियंता महावितरण परिमंडळ कार्यालय समोर सुरू असलेल्या संपामध्ये लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले व कृती समितीच्या वतीने त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

## अनेक आजार एक उपाय; शारीरिक व्याधींवर असा करा कापूरचा रामबाण उपाय

धार्मिकदृष्ट्या कापूरचं महत्व मोठं आहे. ज्योतिषशास्त्रानुसार असं म्हटलं जातं की, कापूर घरात जाळल्याने नकारात्मक शक्ती दूर होते. पूजा करताना कापूर जाळल्याने देवदेवता प्रसन्न होतात अशी मान्यता आहे. ज्योतिषशास्त्राप्रमाणेच आयुर्वेदातही कापराचे असंख्य फायदे आहेत. आयुर्वेदात कापूरचे असंख्य फायदे सांगितले आहेत. कापराचा उपयोग आयुर्वेदात, आणि पारंपरिक औषधांमध्ये अनेक वर्षांपासून केला जात आहे. यामध्ये अँटीसेप्टिक, अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल व वेदनाशामक गुणधर्म असतात, जे विविध आजारांवर उपयोगी पडतात. जंतूनाशक कापूर वैज्ञानिकदृष्ट्या कापूराचे अनेक फायदे आहेत. कापूर जंतू नाशक आहे. फोड, खाज आणि त्वचारोगांवर उपयोगी ठरतो. तुम्हाला जर त्वचेच्या समस्या वारंवार होत असतील अंघोळीच्या पाण्यात कापूर तेल किंवा भिमसेनी कापूर पाण्यात मिसळा आणि या पाण्याने अंघोळ केल्याने त्वचेचे आजार दूर होतात.

पोटावर वाढलेले चरबीचे टायर्स कमी करण्यासाठी ग्रीन टी मध्ये मिक्स करा 'हे' पदार्थ, कायमच दिसाल स्लिम

मानसिक तणाव अधिक जाणून घ्या शारीरिक व्याधींप्रमाणे कापूर मानसिक नैराश्यावर देखील चांगला परिणाम करतं. सतत अतिविचारांमुळे मानसिक ताण तणाव येत असेल तर कापूर यावर रामबाण उपाय आहे. मानसिक तणाव जाणवत असल्यास घरात कापूर जाळा. कापूरच्या वासाने मेंदूवरील अतिरिक्त ताण कमी होतो. तुम्ही जर मेडिटेशन करत असाल तर धूप आणि कापूर जाळा. अशाने मन एकाग्र होण्यास मदत होते.

कापराचा वास मेंदूतील तणाव कमी करतो व मानसिक शांतता निर्माण करतो. यामुळे झोप न लागणे, डोकेदुखी व तणाव असे निद्रानाशाचा त्रास जाणवत असेल तर कापूर य यावर फायदेशीर आहे.

कापराचा नैसर्गिक गुणधर्म हा थंडावा देणारा आहे. त्यामुळे सांधेदुखी, स्नायू दुखी यावर देखील कापराच्या उपायाने आराम मिळतो. तेलात मिसळून कापूर त्वचेवर लावल्यास वेदना कमी होतात. तसेच, कापूराची वाफ घेणे श्वसनमार्गातील अडथळा दूर करते. त्यामुळे कफ, सर्दी, दम्याचे त्रास यावर तो उपयोगी ठरतो.

# वेळूवन बुद्ध विहार भिमनगर केज येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न

केज/प्रतिनिधी केज शहरातील वेळूवन बुद्ध विहार भीम नगर येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप संपन्न झाला.बौद्ध धम्मामध्ये वर्षावास हा एक पवित्र, अनुशासनात्मक आणि धम्मशिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा काळ मानला जातो. आषाढ पौर्णिमेपासून सुरू होणारा हा काळ अश्विन पौर्णिमे पर्यंत चालतो. याकाळात वेळूवन विहारामध्ये दरवर्षी प्रमाणे बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखितबुद्ध आणि त्यांचा धम्म या महान ग्रंथाचे नियमीत वाचन व चिंतन केले गेले तसेच धम्म प्रवचन मालिकेअंतर्गत विविध विषयांवर प्रवचन झाले व धम्म विचार रुजविण्यात आला.



सर्वप्रथम आदर्शांना वंदन करून उपस्थितांनी पंचशील ग्रहण केले.भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष आयु.जयपाल मस्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी धम्म प्रवचन मालिकेतील बौद्ध धम्म आणि मानवता या विषयावर भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पर्यटन प्रसार चे उपाध्यक्ष आयु.संभाजी सोनवणे यांनी विचार मांडले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पूर्वचे पदाधिकारी कोषाध्यक्ष आयु. सुनील शिंदे, आयु.अरुण पटेकर, आयु.मधुकर कदम, तालुकाध्यक्ष आयु.बालासाहेब जोगदंड, सरचिटणीस आयु.रंजीत घाडगे व कोषाध्यक्ष आयु.बळीराम सोनवणे यांची उपस्थिती होती.

भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी अक्षय हजारे यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या शहराध्यक्ष पदासाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विहारात येणाऱ्या सर्व बालक बालिका यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा, संविधान प्रास्ताविका मुखोद्गत आहेत त्या सर्वांचे कौतुक करण्यात आले यामध्ये विहारात नियमितपणे येणारी साडेचार वर्षाची कु.आर्या हजारे हिने सर्वांना संविधान प्रास्ताविक म्हणून दाखविले तिचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.जिल्हा कोषाध्यक्ष आयु. सुनील शिंदे,आयु.अरुण पटेकर,आयु.मधुकर कदम यांनी वेळूवन विहारात चालणाऱ्या कामाबद्दल शुभेच्छा दिल्या.कदम बोलताना म्हणाले , वेळूवन बुद्ध विहार हे तालुक्याचे ऊर्जा केंद्र आहे.आयु.संभाजी सोनवणे यांनी आपला विषय मांडताना बौद्ध धम्म हा मानवता शिकवणारा महान धम्म आहे असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात आयु.जयपाल मस्के यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, या ग्रंथामध्ये धम्माच्या शुद्ध शिकवणीसह मानवी मूल्यांचे विवेचन आहे. वर्षावासाच्या काळात याचे वाचन हे बौद्ध अनुयायांसाठी दिशा दाखवणारे ठरते. वर्षावास काळात ग्रंथ श्रवण करण्यासाठी उपस्थित सर्व बौद्ध उपासक-उपासिका,बालक-बालिका यांचे यावेळी आभार मानले.त्याचबरोबर समारोप प्रसंगी उपस्थित भारतीय बौध्द महासभेचे सर्व जिल्हा पदाधिकारी,तालुका पदाधिकारी व शहर पदाधिकारी यांचे आभार मानले. धम्मयान मासिक,सक्रिय सभासद पावती ,महाविहार महाबोधि आंदोलन, तसेच बौद्ध,मातंग,चर्मकार, ओबीसी बंधुभाव परिषद याबद्दल उपस्थितांना माहिती करून दिली. सर्वांनी भारतीय बौद्ध महासभेत सक्रियपणे काम करावे असे आवाहन करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार संचलन भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस आयु.शिवकुमार मस्के यांनी केले.प्रास्ताविक आयु.बालासाहेब जोगदंड यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके व आयु.महेंद्र मस्के यांचे योगदान लाभले. यावेळी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे शहर पदाधिकारी आयु.चंद्रकांत मस्के, कल्याण मस्के, राहुल माने, अजय गालफाडे, शिवमूर्ती हजारे, अक्षय हजारे, सुशील मस्के, दीपक मस्के, प्रमोद मस्के तसेच महिला शाखेच्या तालुकाध्यक्ष आयु.महानंदा गायकवाड,संस्कार सचिव आयु .कौशल्या मस्के महिला शहराध्यक्ष आयु. सुनीता कांबळे, सरचिटणीस आयु.सुरेखा मस्के, विजयमाला हजारे, कलावती हजारे, सुनीता हजारे, जनाबाई मस्के, रत्नमाला मस्के, आशाताई मस्के, पुष्पा मस्के, कुसुम मस्के तसेच सावित्रीबाई कांबळे, अंजली गायकवाड, हौसाबाई हजारे, प्रमिला मस्के, लक्ष्मीबाई मस्के, गंगुबाई मस्के, सिमंताबाई हजारे तसेच रिपाईचे सुनील हिरवे, आश्रूबा खरात,राहुल मस्के, भारत ढालमारे, लखन मस्के यांची उपस्थिती होती. शेवटी सरनत्त घेऊन, खीरदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मुंबई येथे बुद्धगया येथील महाबोधी विहार मुक्ती महामोर्चाच्या पूर्व तयारीसाठी केज येथे सर्वपक्षीय बैठक संपन्न

केज/प्रतिनिधी बुद्धगया येथील महाबोधी बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे. यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सर्वपक्षीय धम्म बांधवांचा महामोर्चा आयोजित केला आहे. त्या निमित्त केज तालुक्यातील सर्व धम्म बांधवांची बैठक संपन्न झाली.



बुद्धगया येथील महाबोधी विहार हे बौद्ध अनुयायांच्या ताब्यात देण्यात यावे आणि समितीमध्ये असलेल्या गैर धर्मीय सदस्यांना हटवण्यात मागणीसाठी की, १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे सर्व पक्षीय महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन करण्यात येणार आहे. त्या आंदोलनाच्या तयारीसाठी आणि केज तालुक्यातून जास्तीत जास्त बौद्ध अनुयायांनी सहभागी होण्यासाठी दि. ९ ऑक्टोबर रोजी २:०० वाजता केज तालुक्यातील सर्व बौद्ध अनुयायांची बैठक शासकीय विश्रामगृह केज येथे बैठक संपन्न झाली. बैठकीचे निमंत्रक दीपक भाऊ कांबळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीला नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खरात, रवींद्र जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते लखन हजारे, अशोक गायकवाड, पत्रकार गौतम बचुटे, पत्रकार तात्या गवळी, विवेक बनसोड, किरण जोगदंड, राहुल इनकर, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे,माजी नगरसेवक कपिल मस्के, अशोक सरवदे, सुरज काळे, रणजित कांबळे, प्रदीप गायकवाड, शेखर सिरसट, राहुल वाव्हळ, जोगदंड सर, श्रावण वाघमारे, मिठू सरवदे, करण हजारे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बौद्ध बांधव आणि कार्यकर्त्यांनी केज तालुक्यातील जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांनी केले. तसेच या आंदोलनात सहभागी होण्यासाठी गावागावात कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# धम्म, शिक्षण आणि संघटन - आजच्या बौद्ध समाजाची तिहेरी परीक्षा.

भारत हा बौद्ध धम्माचा जन्मस्थळ - बुद्धाची भूमी. तथागत गौतम बुद्धांनी या भूमीवर समतेचा, विवेकाचा आणि करुणेचा संदेश दिला. जगभरात बुद्धाचे विचार शांतता आणि मानवतेचे प्रतीक मानले जातात. पण ज्या भारतात बुद्धाचा जन्म झाला, त्या भारतात आज बौद्ध समाज अनेक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांशी झुंज देताना दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीवर अनुयायांसह बौद्ध धम्म स्वीकारून नव्या युगाचा आरंभ केला. त्यांना बौद्ध धम्म हा केवळ श्रद्धेचा नव्हे, तर समानतेच्या सामाजिक क्रांतीचा धम्म वाटला. आज या क्रांतीचा विचार पुन्हा शोधण्याची वेळ आली आहे.

**सामाजिक समतेचा अपुरा प्रवास:**

बौद्ध धम्माने जातिव्यवस्थेचा विरोध करत मानवाला समानतेचा अधिकार दिला. पण वास्तवात जातभेद अजूनही भारतीय समाजाच्या रंध्रात शिरलेला आहे. ग्रामीण भागात नवबौद्धांना आजही दलित बौद्ध या नावाने हिणवले जाते. सामाजिक बहिष्कार, मंदिरे आणि विहिरींवरील बंदी, विवाहातील भेदभाव अशा अनेक घटनांमुळे समानतेचा दावा आजही अपूर्ण वाटतो.

बौद्ध धम्म स्वीकारूनही समाजाची मानसिकता फारशी बदललेली नाही. धर्मांतर झाले, पण मनोवृत्तीचा परिवर्तनप्रक्रिया संथ आहे. डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते - मनुष्य धर्म बदलतो तेव्हा तो नव्या विचारांचे जग निर्माण करतो. पण हे नवे जग अजूनही आकार घेताना संकोचते आहे.

**शिक्षण आणि आर्थिक मागासलेपणा:**

बौद्ध समाजातील शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी उच्च शिक्षण आणि तांत्रिक क्षेत्रात प्रतिनिधित्व मर्यादित आहे. अनेक कुटुंबे अजूनही श्रमाधारित उपजीविकेवर अवलंबून आहेत. औद्योगिक, व्यापारी आणि प्रशासकीय क्षेत्रात सहभाग कमी आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये बुद्ध, आंबेडकर आणि सामाजिक न्यायाचे विचार फक्त प्रतीकात्मक स्वरूपात आढळतात; त्यांच्या तत्त्वज्ञानाचा व्यवहारात उपयोग कमी आहे. आत्मनिर्भरतेचा मार्ग म्हणजेच अप्प दीपो भव - स्वतःचा दीप बना - हा संदेश विसरला गेला आहे.

**संघटन आणि नेतृत्वाचा तुटलेला धागा:**

डॉ. आंबेडकरांच्या काळात बौद्ध चळवळीत विचार आणि कृती यांचा संगम होता. पण त्यांच्या निधनानंतर चळवळ अनेक भागात विभागली गेली. धार्मिक संघ, सामाजिक संस्था आणि राजकीय गट वेगवेगळे मार्ग घेत आहेत. एकसंध राष्ट्रीय दृष्टी नसल्याने बौद्ध समाजाचे सामूहिक नेतृत्व कमकुवत झाले आहे.

आजची सर्वात मोठी गरज म्हणजे एकसंघ आणि वैचारिक नेतृत्व. बुद्धाचा धम्म हा विचारांच्या एकतेवर उभा आहे; तोच आत्मा पुन्हा जागवणे आवश्यक आहे.

**धार्मिक जाणिवेचा अभाव:**

अनेक नवबौद्धांना बुद्धधर्माचे तत्त्वज्ञान सखोलरीत्या ज्ञात नाही. चार आर्यसत्ये, अष्टांगिक मार्ग, प्रतिच्चसमुत्पाद यांसारख्या मूलभूत संकल्पना बहुधा फक्त औपचारिक विधींमध्ये मर्यादित राहतात.



धार्मिक ओळख म्हणून बौद्ध असणं आणि बौद्ध म्हणून विचार करणं - या दोन गोष्टींमध्ये मोठा फरक आहे. बुद्धांनी सांगितलेला विवेकशील आचरणाचा मार्ग विसरल्याने धम्माचा मूळ आशय हरवत चालला आहे.

**राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय:**

राजकारणात बौद्ध समाजाचे प्रतिनिधित्व मर्यादित आहे. आंबेडकरी चळवळीने कधी काळी समाजाला अधिकारांच्या लढाईसाठी प्रेरित केले, पण आज नेतृत्वाच्या कमतरतेमुळे तो आवाज क्षीण झाला आहे.

आरक्षण, शिक्षण, रोजगार, संस्कृती, आणि हक्क यांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणारे नेते विरळ आहेत. सामाजिक न्याय आणि राजकीय सशक्तीकरण या दोन्ही गोष्टी एकत्र पुढे नेणारे नेतृत्वच बौद्ध समाजाला नवसंजीवनी देऊ शकते.

**सांस्कृतिक वारसा आणि विस्मृती:**

भारताच्या सांस्कृतिक नकाशावर बौद्ध वारशाची असंख्य स्मृतीस्थळे आहेत - सांची, अजिंठा, वेरूळ, वैशाली, कुशीनगर, कार्ला लेणी, नागपूरची दीक्षाभूमी. परंतु या ठिकाणांचे संवर्धन आणि संशोधन पुरेशा प्रमाणात होत नाही. सरकारच्या बुद्ध सर्किट योजनेचा उद्देश पर्यटनवाढ आहे, पण तो बौद्ध समाजाच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाशी जोडलेला नाही. बौद्ध वारसा हे केवळ पर्यटन नव्हे; ते भारतीय अस्मितेचा एक अध्यात्मिक स्तंभ आहे.

**शांतीचा धर्म, संघर्षात अडकलेला समाज:**

जगभरात बौद्ध धर्म शांततेचा आणि करुणेचा प्रतीक मानला जातो, पण भारतात बौद्ध समाजाला अद्याप सामाजिक संघर्षातून बाहेर पडता आलेले नाही. जेथे बुद्धाने अहिंसा आणि मध्यममार्ग शिकवला, तिथे आज विषमता आणि उपेक्षा दिसते. ही विरोधाभासाची परिस्थिती केवळ धर्माची नाही, तर समाजरचनेच्या असमानतेची परिणती आहे. बौद्ध समाजाचा प्रश्न हा मानवतेचा आणि संविधानिक समतेचा प्रश्न आहे.

**पुढील दिशा - नव्या धम्मक्रांतीकडे:**

१. शिक्षणाचे बौद्धीकरण - बुद्ध आणि आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित मूल्यशिक्षण प्रत्येक पातळीवर रुजवणे आवश्यक आहे.
२. आर्थिक आत्मनिर्भरता - युवकांना तंत्रज्ञान, उद्योग, आणि हरित अर्थव्यवस्थेत संधी मिळण्यासाठी विशेष धोरणे आखावीत.
३. संघटनात्मक एकता - सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संस्था एकत्र आणून राष्ट्रीय बौद्ध मंच निर्माण करणे गरजेचे आहे.
४. स्त्री नेतृत्वाचा विकास - भिक्षुणी संघ आणि महिला बौद्ध नेत्यांना प्रमुख भूमिका दिली पाहिजे.
५. वारसा संवर्धन - बौद्ध स्थळांना धम्म साधना केंद्र म्हणून विकसित करावे, केवळ पर्यटन केंद्र म्हणून नव्हे.
६. सामाजिक संवाद - बौद्ध धर्माचा करुणा आणि समतेचा संदेश सर्व धर्मीय समाजांपर्यंत पोहोचवून एकात्मता वाढवावी.

बुद्धधर्माचा सारांश म्हणजे करुणा, विवेक आणि समानता. आजच्या भारतात या तीन मूल्यांचीच सर्वाधिक गरज आहे. बौद्ध समाजाने जर शिक्षण, संघटन आणि नैतिक आचरण या तिन्ही क्षेत्रांत नव्याने जागरूकता आणली, तर बुद्धाचा धम्म पुन्हा समाजजीवनाच्या केंद्रस्थानी येईल.

डॉ. आंबेडकर म्हणतात - मी बुद्धाला म्हणून मानतो की त्यांनी मला विचार करायला शिकवले. हीच विचारशक्ती, हीच विवेकनिष्ठता आणि हीच करुणा - भारतातील बौद्ध धर्माला नव्या अध्यायाकडे घेऊन जाऊ शकते.

*********

- दादाराव कैलास तायडे.
(बी. कॉम., एल एल.बी., एम. ए. (राज्यशास्त्र), सेट)

# प्रभाग क्रं ३ मधील अतिवृष्टीग्रस्तांना सरसकट विनाअट शासकीय मदत मंजूर करावी - राष्ट्रवादी किसान सभेची तहसीलदारांना मागणी



लातूर / प्रतिनिधी :-लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ०३ मधील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना सरसकट व विनाअट शासकीय मदत मंजूर करण्याची मागणी राष्ट्रवादी किसान सभेने केली आहे. याबाबत माजी मंत्री तथा आमदार मा. संजय बनसोडे यांनी तहसीलदारांना पत्र देऊन तात्काळ नुकसान भरपाई वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर भाग हा मागासलेला असल्याने येथील बहुतेक घरे कच्ची व कमकुवत आहेत. सप्टेंबर महिन्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे या परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले, छते गळू लागली, काहींचे पत्रे उडून गेली. त्यामुळे घरातील संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य, राशनसह सर्व वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून नागरिकांचे जीवनमान अत्यंत कठीण बनले आहे. प्रभाग ०३ मधील प्रभावित परिसर: इंदिरानगर, साठेनगर, जयभीमनगर, राजीवनगर, संत गोरोबा सोसायटी, वैभव सोसायटी, यशवंत भैय्या नगर, आनंदनगर, महात्मा गांधी कुष्ठधाम वस्ती, बालाजीनगर, तुळजाभवानी नगर (भोई वाडा), करीमनगर, प्रबुद्धनगर, म्हसोबानगर, पंचवटीनगर आदी वस्त्यांतील नागरिकांना अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसला आहे.

या भागातील रहिवाशांकडे मालकीहक्काचे कागदपत्र नसल्यामुळे त्यांना घरकुल किंवा शासकीय अनुदान मिळत नाही. नागरिक मागील २५ ते ३० वर्षांपासून या गायरान जागेवर राहतात. त्यामुळे प्रशासनाने या नागरिकांना अतिवृष्टीग्रस्त म्हणून तातडीची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन सादर करताना उपस्थित: राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार सौदागर तांदळे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मकरंद सावे, प्रशांत पाटील, संतोष उपाडे, प्रणिती सूर्यवंशी, प्रा. अमर वाघमारे, प्रविण थोरात, खमर काजी, राजकिरण सूर्यवंशी, जाहागीर शेख, दिनेश काबळे, कबीर शेख, हेमंत जाधव, सचिन मेटे, ज्ञानेश्वर पाटील, अविनाश राठोड, राजेश खटके, राहुल काबळे, रमाकांत कसबे, काशीनाथ गव्हाणे तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाषा एकमेकांना जोडण्याचे काम करून माणुसकी निर्माण करते – प्रा. डॉ. दत्ता साकोळे यांचे प्रतिपादन

मुरूड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि. ८/१०/२०२५ रोजी मराठी व हिंदी अभ्यास मंडळाचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे आणि उद्घाटक म्हणून शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब येथील हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ता साकोळे उपस्थित होते. तर मंचावर मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ.पी.बी.महाजन, हिंदी विभागाचे प्रा.ए.आर.पाटोळे यांची उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात बोलताना प्रा. डॉ. दत्ता साकोळे म्हणाले की, भाषा एकमेकांना जोडण्याचे काम करून माणुसकी निर्माण करत असते. भाषा सुमधुर असली तर एकमेकांतील वैमनस्य दूर होऊन एकमेकांत माणुसकीच्या बीजांची पेरणी होते. तसेच भारतीय संविधानातील आम्ही सर्व भारतीय आहोत ही भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे. आजच्या विद्यार्थ्यांची देशभक्तीची भावना लुप्त होत चालली आहे म्हणून आजच्या अध्यापकांनी अध्यापनातून




मानवी मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यात करावी. प्रत्येक विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, मेहनत करून आलेल्या संकटांचा सामना करावा आणि जीवनात यशस्वी व्हावे असे प्रतिपादन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम बोलताना म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी मराठी आणि हिंदी भाषा अवगत करून भाषेतील ज्ञान मिळवून ज्ञानवंत व्हावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा सौ. पी. बी. महाजन यांनी केले. यावेळी त्यांनी मराठी भाषेचा संक्षिप्तात आढावा घेऊन भाषा समृद्ध करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे आवाहन केले. यावेळी मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष अर्जुन चव्हाण, उपाध्यक्ष कु.नेहा समुद्रे, सचिव संदेश हिंगे तर हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष कु.काळे मनीषा सोमनाथ, उपाध्यक्ष सावंत श्रीनिवास सतीश, सचिव कु. टेकाळे अश्विनी बाळासाहेब या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कु.कुंभार मयुरी कु.गाडे श्रुती, कु. लोंढे सृष्टी यांनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कोल्हे जी.एम. व कु. कुंभार मयुरी यांनी केले तर आभार प्रा.एम.ए.आल्टे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. घोडके एस.के. प्रा. डॉ. उषा ठोंबरे, प्रा.नायने ज्ञानेश्वर, प्रा डॉ.अत्तार तहेसीनबी, प्रा.राठोड राधा, समाजशास्त्र विभागाचे प्रा.उपाडे विजय यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरन्यायाधीश यांच्यावरील हल्ल्याचा राष्ट्रीय चर्मकार महासंघाकडून निषेध



लातूर : नवी दिल्ली येथील देशातील सर्वोच्च न्यायव्यवस्थेचे प्रमुख सरन्यायाधीश माननीय भूषण गवई यांच्यावर एका मनुवादी मानसिकतेच्या वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला ही घटना अतिशय निंदनीय आहे आणि देशासाठी लाजिरवाणी पण आहे या घटनेचा राष्ट्रीय चर्मकार महासंघ तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. लातूर जिल्हा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हा शाखेच्या वतीने लातूर निवासी जिल्हा अधिकारी केशव नेटके यांना निवेदन देऊन जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला या निवेदनावर जिल्हाध्यक्ष रवी कुरील जिल्हा सचिव डॉ नरसिंग वाघमोडे जिल्हा संघटक बालाजी शेरखाने गटई कामगार जिल्हाध्यक्ष नंदकुमार बनसोडे ज्येष्ठ नेते नेताजी राऊत शहराध्यक्ष परमेश्वर कांबळे आदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अट्रॉसिटी केसमध्ये सुभाष निंबाळकर यांना अटकपूर्व जामीन खोटी तक्रार दाखल केल्याचा निंबाळकरांचा आरोप

लातूर :- प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सुभाष निंबाळकर यांच्यावर एका तक्रारीवरून लातूरच्या विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून प्रकरण लातूर न्यायालयात प्रविष्ठ केले होते. या प्रकरणात सुभाष निंबाळकर यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. याबाबत माहिती अशी की, स्वातंत्र्य सैनिक गृह निर्माण सोसायटीचे चेअरमन सुभाष निंबाळकर यांनी जातीयद्वेषापोटी २०२५ ते २०३० संस्थेच्या निवडणूक मतदार यादीतून १७ मागासवर्गीय सदस्यांची नावे वगळली. असा चुकीचा आरोप करून निंबाळकर यांच्या विरुद्ध अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची तक्रार दिली. त्यावरून विवेकानंद चौक पोलिसांनी निंबाळकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. मुळात सदर गृह निर्माण सोसायटीच्या १७ लोकांचे प्लॉट्स सोसायटीच्या नियमाप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी जप्त केले आहेत. हे सत्य असताना माझ्याविरुद्ध संबधीत सदस्यांनी तक्रार दिली. संस्थेच्या उपविधीतील कलम ५६ (८) नुसार हुकूमनाम्यद्वारे प्लॉट्स जप्त झाल्यास सभासदत्व समाप्त होते. याबाबतचे कागदपत्र सादर केले असताना पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी सुभाष निंबाळकरावर गुन्हा दाखल केला. या प्रकरणात निंबाळकर यांनी ए ॅड. सुभेदार मादळे यांच्या मार्फत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मादळे यांच्या युक्तिवादा नंतर सदरचे प्रकरण हे निव्वळ दिवाणी स्वरूपाचे असल्याचे सांगून लातूर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात माझा संबंध नसताना, मी पुरोगामी, फुले शाहू आंबेडकर विचाराचा पाईक असताना, नामांतर लढ्यात





तुरुंगवास भोगलेला, आंतरजातीय विवाहची चळवळ घरातून राबवणारा असताना माझी प्रतिमा मालिन करण्याचे मनुवाद्याचे काटकारस्थान असल्याचे सुभाष निंबाळकर यांनी म्हटले आहे.

# केवळ भारतालाच नाही तर अखिल विश्वाला बुद्धाशिवाय पर्याय नाही – प्रा. विजय मोहिते

मुंबई :- भारताच्या प्रत्येक भागात बुद्धधम्माची गाठ असलेला इतिहास आहे. मुंबईस्थित 'म्हातारीचा बूट' म्हणजे प्राचीन काळातील व्यापारी व सांस्कृतिक वाटा आहे तर कोकणातील चिपळूण व परशुराम घाट परिसरातही बौद्ध संस्कृतीची चिन्हे आढळतात या घाटमार्गानेच प्राचीन भारतातील व्यापारी आणि भिक्षू दक्षिण व पश्चिम किनाऱ्यावर बुद्धविचार प्रसारित करीत. मालशेत घाटापासून ते नाशिक, कार्ले, भजा, कान्हेरी, औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ, नालंदा, राजगीर अशा असंख्य ठिकाणी असलेली बुद्ध लेणी ही भारताच्या सांस्कृतिक चेतनेची जिवंत उदाहरणे आहेत. या लेण्यांमध्ये केवळ कलात्मकता नाही तर त्यातून त्या काळातील सामाजिक समता, शिक्षण आणि करुणेचा प्रवाह दिसतो. आजचे जग वेगाने तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेले आहे कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, युद्धतंत्रज्ञान, हवामानबदल हे सारे मानवतेसमोर नवे प्रश्न उभे करत आहेत परंतु या सर्व प्रश्नांची उत्तरे तंत्रज्ञानात नाहीत ती मानवी चेतनेच्या प्रज्ञेत आहेत म्हणूनच केवळ भारतालाच नाही तर अखिल विश्वाला बुद्धाशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन पाली भाषेचे गाढे अभ्यासक प्रा. विजय मोहिते यांनी सम्राट अशोक विजयादशमी, ६९ वा धम्मचक्रप्रवर्तन दिन व बौद्धजन पंचायत समितीच्या शाखा क्र. ८३० चे १३ वे वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ता या नात्याने बोलत असताना केले. बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र. ८३० संलग्न माता रमाई महिला मंडळ चिंचपाडा कल्याण पूर्व यांच्या संयुक्त विद्यमाने सम्राट अशोक विजयादशमी, ६९ वा धम्मचक्रप्रवर्तन दिन तसेच शाखेचे वर्ष १३ वे वर्षपूर्ती कार्यक्रम प्रशांत तुळशीराम गमरे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव अनिल शिवराम गमरे यांनी आपल्या पहाडी आवाजात अत्यंत प्रभावी भाषाशैलीत केले तर सिध्दार्थ गोविंद पवार यांनी प्रस्ताविक सादर करताना पंचायत समितीचा अनुभव आणि कार्यकर्त्यांची तळमळ यावर प्रकाश टाकला, तद्नंतर सर्वांच्या विनंतीस मान देऊन पुज्य भन्ते मुदितानणंद यांनी सुमुधुर व पवित्र वाणीने धार्मिक पूजाविधी संपन्न केला. कार्यक्रमांचे अध्यक्ष प्रशांत तुलशिराम गमरे यांनी महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. त्यानंतर २०२५ साली भरघोस गुणांनी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना मौलिक मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोबतच मान्यवर, जेष्ठ महिला-पुरुष कार्यकारिणी यांना पंचाध्वज, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले, अध्यक्षीय भाषणात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत गमरे यांनी



प्राध्यापक विजय कृष्णा मोहीते यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यार्थ्यांना संदेश' या विषयावर मुद्देसूद मांडणी करत केलेले विवेचन हे प्रत्येक धम्मबाधंवाच्या डोळ्यात अंजन घालणारे असून 'मी बौध्द धम्माच्या विरूद्ध विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही' हे ऊपस्थितीत सर्वांच अगदी साध्या व सोप्या भाषेत सौंदहरणास पटवून दिले त्यामुळे त्याचे आभार मानले व त्यांना शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित केले. सदर कार्यक्रमास कार्याध्यक्ष अनिल बा.जाधव, उपाध्यक्ष प्रदिप ज. काबळे, मिलिंद ग.पवार, खजिनदार सुनिल तुकाराम पवार, उपखजिनदार सचिन वि. पवार, उपसचिव रुपेश ज. जाधव, निलेश सु. मोहीते, सल्लागार विष्णु वि. पवार (बौध्दाचार्य), वाल्मिक र. पगारे, संदिप म.हिरे, सुशील के. मोरे, प्रदिप पा.जाधव, सिध्दार्थ गो. पवार, अंनत पा गमरे, मुकेश के.जाधव, महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा ज्योती अनिल गमरे, उपाध्यक्षा सुप्रिया सु.पवार, अस्मिता अ.जाधव, खजिनदार स्वाती प्रमोद जाधव, उपखजिनदार अस्मिता प्र. कांबळे, सुनिधी प्र.गमरे, सचिव सानिका स. पवार, उपसचिव पुजा प्र.जाधव, उपसचिव पार्वती वा पगारे, माजी सचिव सुषमा सु.सिंग, सल्लागार प्रेमा सु.सुर्यगंध आशा मु. गमरे, स्मिता सु.मोरे, अनिता अंनत गमरे, ज्योती वि.जाधव, ललिता पा. जाधव, मालती के. जाधव, स्मिता सि. पवार, सुजता तु.गमरे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे आभार व्यक्त करून प्रकाश तुळशीराम गमरे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## सरन्यायाधीशांवर हल्ला हा लोकशाही मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा :- तेजराव वानखेडे.

वाशिम : - भारतीय लोकशाही फारच धोकादायक वळण घेत आहे. ज्यांनी देशाला एकत्रित ठेवले ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय राज्यघटनेवरच हल्ले चालवले जात आहेत.सरन्यायधीशांच्या कक्षात बूट उगारली जाणे व त्यांच्या दिशेने भिरकावणे ही घटना एखाद्या वेडसर व्यक्तीचे करामत नसून त्यावर खोलवर रुजलेली जातीय,धर्मांध मानसिकता दिसत आहे.लोकशाही व्यवस्थेत मतभेद असणे जितकी अपेक्षित आहे तितकेच ते मतभेद संविधानिक मार्गाने व्यक्त होणे अपेक्षित आहे.मात्र संविधानाने घालून दिलेल्या मर्यादा ओलांडून जेव्हा मतभेद हिंसक किंवा विकृत मार्गाने होऊ लागतात तेव्हा लोकशाही मूल्यावर प्रश्नचिन्ह उभे झाल्याशिवाय राहत नाहीत असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवलेचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले. भाषा,संस्कृती,जाती,धर्म अशा अनेकत्वातून एक देश म्हणून भारत उभा झाला असेल तर त्यामागे या देशाने स्वीकारलेल्या लोकशाही मूल्य हीच एक कारण आहे.याला गालबोट लावण्याचे कोणीही धाडस करू नये.न्यायपालिका ही लोकशाहीचा प्राण आहे.संविधानाचा प्राण आहे.सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ला हा लोकशाहीच्या प्राणावर केलेला हल्ला असून हा हल्ल्याचा प्रकार



राष्ट्र द्रोह ठरवला पाहिजे व हल्लेखोरांना राष्ट्रद्रोही समजून त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी रिपाईचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी आपल्या निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत देशाचे राष्ट्रपती यांना केली आहे.या निवेदनावर जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांच्यासह रिपाईचे नेते प्रकाश गवई,जिल्हा युवा अध्यक्ष गजानन वानखेडे,हिरामण साबळे,संतोष वानखेडे,सचिन गुडदे,सचिन भालेराव,दिलीप कांबळे,सिद्धार्थ पाटील,रामदास भगत,परिवर्तन कला महासंघाचे जिल्हाध्यक्ष शेषराव मेश्राम आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# लातूर शहरात विदयार्थ्यांमार्फत एक लाख वीस हजार वृक्ष लागवड होणार

लातूर/ प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेच्या पुढाकाराने एक विदयार्थी- एक वृक्ष हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण विभाग व वन विभाग लातूर यांच्यामार्फत मोफत वृक्ष वाटप करण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून लातूर शहरातील एकुण ३५० शाळेमधील प्रत्येक विदयार्थ्यांना एक वृक्ष असे जवळपास १,२०,००० (अक्षरी एक लाख वीस हजार ) वृक्ष वाटप करण्यात येत आहेत. दि. ०९/१०/२०२५ रोजी लातूर शहरातील श्री श्री रविशंकर विदयामंदीर या शाळेमध्ये मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते विदयार्थ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी लातूर शहरामध्ये वृक्ष लावणे किती महत्वाचे आहे याबाबत त्यांनी विदयार्थ्यांमध्ये जनजागृती केली. तसेच विदयार्थ्यांनी लावलेल्या झाडाची जबाबदारी शिक्षकांनी घ्यावी असे आवाहन केले.

यावेळी एक विदयार्थी- एक वृक्ष या उपक्रमाचे प्रणेते ए. एस नाथन यांनी विदयार्थ्यांना भावनिक मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी माणुस व वृक्ष यांचे नाते याबाबत स्पष्ट करून सांगितले. माणसाच्या वंशाला वृक्ष त्याची दुसरी आई म्हणून जन्म देतो परंतु माणुस वृक्षाचा वंशच होऊ देत नाही त्यांना कापून नष्ट करत आहे, उपटून टाकत आहे, तसेच जाळून टाकत आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास लातूर मनपातील वाहन विभाग प्रमुख पवन सुरवसे, वृक्ष क्रांती मिशनचे संस्थापक (ऑक्सीजन मॅन) ए एस नाथन, मुख्याध्यापिका सोनाली कुलकर्णी (मराठी माध्यम), मुख्याध्यापिका विनया मराठे (इंग्रजी माध्यम),शिक्षण विस्तार अधिकारी धनराज गित्ते, नोडल प्रमुख तुकाराम पवार व शाळेतील शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. लातूर शहर हरीत करण्यासाठी मनपा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम चालू आहे.







हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.